## गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ सप्टेंबर २०१९.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए.०८१९/प्र.क्र-१४६/रा.उ.शु-२- ज्याअर्थी मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३ ) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिध्दीशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (१) व पोट-कलम (२) च्या खंड (f) आणि (h१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ मध्ये पुढील नियम करीत आहे : —

१. या नियमांना मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) (सुधारणा) नियम, २०१९ असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ चा नियम ५,—

(i) खंड (ब) मधील "किंवा एफएल-३ " हे शब्द काढून टाकण्यात येत आहेत.

(ii) खंड (ब) नंतर खालील खंड ( ब-१) समाविष्ट करण्यात येत आहे.

"(ब-१) मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ अन्वये मंजूर करण्यात आलेली एफएल-३ अनुज्ञप्ती हस्तांतरीत करण्यासाठी अनुज्ञप्ती मंजूरी, नुतनीकरण किंवा पुढे चालू ठेवणे यापैकी जे शुल्क जास्त असेल त्या शुल्काच्या २ पट शुल्क आकारण्यात यावे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे**,
शासनाचे सहसचिव.

**HOME DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 16th September 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BPA. 0819/C.R.-146/EXC-2.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Prohibition (Privilege Fees) Rules, 1954, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section *(3)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses *(f)* and *(h1)* of sub-section *(2)* of section 143 of Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Prohibition (Privilege Fees) Rules, 1954, as follows, namely : —

1. These rules may be called the Bombay Prohibition (Privilege Fees) (Amendment) Rules, 2019.

2. In rule 5 of the Bombay Prohibition (Privilege Fees) Rules, 1954, —

*(i)* in clause *(b),* the words "or FL-III" shall be deleted ;

*(ii)* after clause *(b),* the following clause shall be inserted, namely : —

"*(b1)* the fee payable by any licensee for the privilege of having the transfer of the licence in Form FL-III granted under the Bombay Foreign Liquour Rules, 1953 shall be two times of the fee chargeable for grant, renewal or continuance of such licence, whichever is higher.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.